वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती पेठ यांचे कडील पत्र जा.क्र/शि-१/२६३/१९९९ पेठ दिनांक ४/१२/१९९९

२) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र. शि/प्राथ-९/११९/१९९९ दि.१८/१२/१९९९

३) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/२८८/२००१ दि.२१/५/२००१

४) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील अहवाल क्र.विशा ४/खाचौ/सीआर ४६/२००१ दिनांक २९/५/२००२

५) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/६२४/२००२ दि.३/१०/२००२

६) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक :-१९/८/२०१७

---

**आदेश**

शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र./शिक्षण/प्राथ-९/५९९/२०१७
दिनांक२१/ ८ /२०१७.

ज्याअर्थी श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक जिल्हा परिषद शाळा धानपाडा ता.पेठ येथे काम करीत असतांना शालेय कामी अनाधिकृत गैरहजर राहिल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती पेठ यांचे कडील पत्र जा.क्र/शि-१/२६३/१९९९ पेठ दिनांक ४/१२/१९९९ अन्वये श्री.घृणावंत यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक यांना संदर्भ क्र.२ मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र. शि/प्राथ-९/११९/१९९९ दि.१८/१२/१९९९ अन्वये यांचे ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ बजाविण्यात आले असून सदर ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला श्री.घृणावंत यांनी खुलासा सादर केला नसल्याने संदर्भ क्रमांक ३ अन्वये मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/२८८/२००१ दि.२१/५/२००१ अन्वये सहाय्यक आयुक्त चौकशी यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती सहाय्यक आयुक्त चौकशी तथा चौकशी अधिकारी यांनी श्री.घृणावंत प्रा.शि यांचे विरुध्दात ठेवण्यात आलेले आरोप १. अनाधिकृत गैरहजर राहणे २.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणे या आरोपा बाबत सविस्तर चौकशी करण्यात आलली आहे.

ज्याअर्थी या आरोपाबाबत सविस्तर चौकशी करून मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी संदर्भ क्र.४ अन्वये क्र.विशा ४/खाचौ/सीआर ४६/२००१ दिनांक २९/५/२००२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. उक्त चौकशी अहवालावरुन श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे, असा अहवाल सादर केला आहे.

ज्याअर्थी श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग ३ नियम ४ (७) नुसार जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ का करण्यात येवू नये ? याबाबत संदर्भ क्र.५ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/६२४/२००२ दि.३/१०/२००२ अन्वये देण्यांत येवुन त्याबाबतचा खुलासा २१ दिवसांच्या आंत सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते त्यानुसार श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक यांनी खुलासा सादर केला नसल्याने त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द् होते.

त्याअर्थी श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खातेचौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये श्री.घृणावंत प्रा.शि.यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चा भाग ३ नियम ४ (७) नुसार श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक यांना जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

[signature] 17/08

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति,

श्री.जगन्नाथ सुपडूसिंग घृणावंत प्राथ.शिक्षक जिल्हा परिषद शाळा धानपाडा ता.पेठ

प्रत :- गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती पेठ